वि.दि.दा. क्र.९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.३
(नि.क्र.४३९)



**माझे नाव -** विनायक नामदेव पाटील**,वय – ४५** वर्षे**,**
**धंदा -** नौकरी**, रा.** गारगोटी ता. भुदरगड जि.कोल्हापूर.

**वादीतर्फे सरतपास श्री.व्ही.एस.शेळके वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**१.** मी भुदरगड नागरी सहकारी पतसंस्था शाखा गारगोटी येथे १९९७ सालापासून कार्यरत असून आज रोजी शाखाधिकारी म्हणून तिथे काम करतो. १९८९ साली गंगाधर देपे यांनी आमच्या संस्थेकडे टॅक्ट्रर खरेदी व पाईपलाईनसाठी रक्कम रु.१,५०,०००/ व आणखी काही रक्कमेची मागणी केली होती. कागदपत्रांची पुर्तता करुन त्यांना कर्ज दिले होते. या कर्जास तारण म्हणून कोपरा येथील काही जमीन त्याने तारण दिली होती. आम्ही आमच्या कर्जाचा बोजा त्या जमीनींच्या सातबारा उता-यावर नोंदविला. त्यांनतर त्यांना कर्ज दिले. त्यांनी कर्ज मुदतपूर्व फेडले. बोजा कमी व्हावा म्हणून आमच्या संस्थेने त्यांना पत्र दिले. गट क्रं. ७०/१/२, ७१/२/२, ७१/२/४, ५,६,८ व ९ यावरील बोजा उतरविण्यासाठी आम्ही पत्र दिले. सदर पत्र आता मला दाखविले . ते निशाणी ४३८/१ लगत आहे. त्यावरील शाखाधिकारी म्हणून असलेली सही माझी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४४०** देण्यात येते. गंगाधर यांनी घेतलेल्या कर्जाचे खाते क्रमांक २९१ याचा कर्जखाती उतारा मी आणलेला आहे. त्यातील नोंदी बरोबर आहे. जशा घडल्या तशा लिहील्या आहेत. त्यावर बॅंकेचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ४४१** देण्यात येते. गंगाधर यांनी घेतलेल्या कर्जाचे खाते क्रमांक २९८ याचा कर्जखाती उतारा मी आणलेला आहे. त्यातील नोंदी बरोबर आहे. जशा घडल्या तशा लिहील्या आहेत. त्यावर बॅंकेचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ४४२** देण्यात येते. गंगाधर देपे वगळता या आडनावाचे अन्य कोणतेही खाते आमच्या शाखेत नाही. स्वत: गंगाधर यांनी सदर कर्ज फेडलेले आहे. कर्जाचा उद्देश शेतीची अवजारे व पाईपलाईन होता.

**सरतपास पूर्ण.**

वि.दि.दा. क्र.९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.२
(नि.क्र.४३६)

**<u>प्रतिवादी १ ते ५ तर्फे श्री. बी.एन.पौळ वकिल यांच्यामार्फत उर्वरीत सरतपास शपथेवर सुरु.</u>**

**२.** हे खरे की, १९८९ साली मी आमच्या संस्थेत कार्यरत नव्हतो. तत्कालीन मॅनेजर कोण होते हे मला सांगता येणार नाही. भुदरगड नागरी सहकारी पतसंस्थेचे कार्यरत महाराष्ट्र राज्यात आहे. यासंबंधीची कागदपत्रे माझ्याकडे नाहीत. हे खरे नाही की, कोपरा ता. अहमदपूर आमच्या पतसंस्थेच्या कार्य क्षेत्रात येत नाही. आमच्या संस्थेला कोपरा गावातील जमीनीवर कर्ज दयायचा अधिकार नव्हता हे मला सांगता येत नाही. आमच्या संस्थेचे मुख्य कार्यालय गारगोटी येथे आहे. तेथे सरव्यवस्थापक अनंत नाईक हे आहेत. त्यावेळी जिल्हा बाहेर मिळकतीबद्दल कर्ज प्रकरण नसल्याने वरीष्ठांची परवानगी घेतली किंवा नाही हे मला माहिती नाही. हे खरे की, याकामी खाते उता-यांचा बँकर्स बुक पुरावा कायदयाप्रमाणे दाखला दिलेला नाही. गंगाधर यांचा एकत्र कुटुंबात कोण सदस्य आहेत हे मला सांगता येत नाहीत. गट क्रं. ७०/१/२, ७१/२/२, ७१/२/४, ५,६,८ व ९ या जमीनी कोणाच्या नावे आहेत व त्याचे क्षेत्र किती हे मला सांगता येत नाही. माझ्या माहितीप्रमाणे रु.१,३०,०००/- व रु.३०,०००/ अशी दोन कर्ज प्रकरणे आहेत. दीड लाख कर्जाच्या रक्कमेबद्दल मला माहिती नाही. ३०,०००/- चे कर्ज १९८९ साली दिले आहे. त्या कर्जाला कोणत्या जमीनी तारण होत्या हे मला माहिती नाही. गंगाधरसोबत कोणी अन्य सहकर्जदार होते किंवा कसे हे मला माहिती नाही. त्याबद्दल मला काहीच माहिती नाही. त्यांनी बँकेला काही कागदपत्रे लिहून दिली किंवा कसे हे मला माहिती नाही. कर्जाला अन्य भावांची संमती होती किंवा ते एकत्र कुंटुंब होते याबद्दल मला माहिती नाही. कर्ज मंजूरीसाठी कोणती कागदपत्रे पूर्ण करुन घेतली याची मला माहिती नाही हे खरे आहे. गंगाधर वनखात्यात गारगोटी येथे कार्यरत होते ही माझी ऐकीव माहिती आहे. कर्जाची नोंद जमीनीच्या अभिलेखी झाल्याबद्दल आमच्याकडे रेकॉर्ड आहे. गट क्रं. ७०/१/२, ७१/२/२, ७१/२/४, ५,६,८ व ९ यामध्ये गंगाधर शिवाय अन्य सहहिस्सेदार

होते काय हे मला सांगता येत नाही. गट क्रं. ५,६,८,९ याचे मालक कोण होते हे मला सांगता येत नाही. आमच्या संस्थेने दिलेले कर्ज बेकायदेशीर आहे हे खरे नाही. गंगाधर व तत्कालीन शाखाधिकारी यांचे मैत्रीचे संबंध असल्याने सदर कर्ज देण्यात आले याबद्दल मला माहिती नाही. हे खरे की, १९९७ पूर्वीचा बँकेचा व्यवहार मला माहिती नाही. गंगाधर देपे यांच्या सांगण्यावरुन मी साक्षीला आलो आहे. हे खरे नाही की, मी आज रोजी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**